सोमवार, दि. २५ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## खाजगी क्लासेसमध्ये विद्यार्थ्यावर हल्ला

### शैक्षणिक संस्थांतील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील मंठा चौफुली परिसरातील अंकुश सर क्लासेस येथे शनिवारी (दि. २३) घडलेल्या धक्कादायक घटनेने शिक्षण संस्थांमधील सुरक्षा आणि शिस्तीबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. सीईटीच्या तयारीसाठी आलेल्या विद्यार्थ्याला दोन सहाध्यायांनी वॉशरुमजवळ लोखंडी रॉड व दगडाने बेदम मारहाण केल्याची घटना उघड झाली आहे. गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या विद्यार्थ्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत, तर या दोघांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यश रमेश इंगळे (१८, रा. सोनलनगर, जालना) हा इयत्ता बारावीतील विद्यार्थी सीईटीच्या कोचिंगसाठी अंकुश सर इन्स्टिट्यूटमध्ये नियमित येतो. शनिवारी तो नेहमीप्रमाणे सकाळी ११.१५ वाजता क्लासला आला होता. दुपारी १.१५ वाजता क्लासेसमध्ये ब्रेक झाल्यावर तो पार्किंगजवळील वॉशरुममध्ये गेला.

तेव्हाच त्याच क्लासमधील अजिंक्य सांगळे आणि अभिजित शिरोळे (दोन्ही रा. जालना) हे वॉशरुमकडे आले. सुरुवातीला दोघांनी यशला शिवीगाळ केली आणि त्यानंतर अजिंक्य सांगळे याने सोबत असलेल्या लोखंडी रॉडने डोक्यात वार केला.



त्याच वेळी अभिजित शिरोळे याने रुमालात बांधून आणलेला दगड डोक्यात मारला. या हल्ल्यात यश गंभीर जखमी झाला आणि बेशुद्ध पडला. त्वरित त्याच्या मित्रांनी त्याला जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले.

या घटनेनंतर यश इंगळे याने शुद्धीवर आल्यानंतर दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी अजिंक्य सांगळे आणि अभिजित शिरोळे या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हेड कॉन्स्टेबल सुभाष पवार पुढील तपास करत आहेत. या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये प्रचंड चिंता निर्माण झाली आहे.

या घटनेने खाजगी शिकवणी केंद्रांतील शिस्त व सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी पुन्हा समोर आणल्या आहेत. अशा प्रतिष्ठित कोचिंग संस्थांमध्ये सुरक्षा रक्षक, कॅमेरे किंवा आपत्कालीन यंत्रणा असली तरी त्याचा उपयोग तो होतो याचेही विवेचन होणे गरजेचे असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या प्रकरणी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी प्रशासनाने तातडीने तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच कोचिंग क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी ठोस नियमावली लागू करावी, अशी मागणी केली आहे.

या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. यशचे नातेवाईक आणि मित्रांनी आरोप केला की, क्लास प्रशासनाने योग्यवेळी लक्ष दिले असते तर हल्ला टाळता आला असता. काही पालकांनीही अशा घटनांमुळे विद्यार्थ्यांची मानसिकता व अभ्यासावर परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली.

स्पर्धात्मक परीक्षांच्या तणावामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिडचिड, असहिष्णुता आणि राग वाढलेला दिसतो. सुरक्षा यंत्रणेतील त्रुटी, अशा घटनांवर त्वरित कारवाईसह कोचिंग संस्थांना जबाबदार धरणे आवश्यक आहे. गुन्हा नोंद झाल्यानंतर आरोपींवर वेगाने तपास व चार्जशीट दाखल होणे गरजेचे आहे.

अंकुश सर क्लासेसमध्ये झालेल्या या घटनेमुळे शिक्षण संस्थांमधील सुरक्षा आणि शिस्तीच्या यंत्रणांवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आगामी काळात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रशासन, पोलीस आणि क्लास व्यवस्थापनाने समन्वय साधून ठोस उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे.



गणपती बाप्पाचे आगमन दोन दिवसांवर येऊन ठेपले असून व २५ फुटांच्या विविध प्रकारच्या मुर्ती बाजारात दिसत आहेत. गणपती बाप्पाच्या मुर्तीवर शेवटचा हात फिरवताना कलाकार दिसत आहे. (छायाचित्र - किरण कानापुरे)

---

युवा आदर्श

### शून्य ...

**एकत्र आलो तरीही**
**उपयोग झालाशून्य**
**आम्ही राही पहात**
**निवडून आले अन्य**
**कळत नाही जनते**
**काय आहे रे मान्य**
**आमच्याहून हुशार**
**कसे ते सर्वसामान्य**
**छत्र्या वाटप केल्या**
**तेंव्हा लपला पर्जन्य**
**फक्त खर्च वायफळ**
**अंगलट येई सौजन्य**
**साठवण गेली वाया**
**वाटून टाकले धान्य**
**आमच्या हाती झोळी**
**नडले उदार प्राधान्य**
**गर्दी करतात सभेला**
**आम्हा वाटे शतधन्य**
**मागचे काही काढून**
**जोडे संबंध अन्योन्य**
**गणित नेहमी चुकते**
**का वाटेला येते दैन्य**
**इकडे सगळे सरदार**
**लढायला नाही सैन्य**
**कसे फुंकावे रणशिंग**
**मय सभेत औदासिन्य**
**मनात योजले चांगले**
**घडते भलतेचं भिन्न**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

## संत संगतीशिवाय तरणोपाय नाही; संतांच्या संगतीत राहिल्याने आपल्याला जीवनाचा खरा अर्थ समजतो

### आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन

### आमदार बबनराव लोणीकर शब्दाला जागणारा माणूस - हभप अर्जुन महाराज लाड

**परतूर । प्रतिनिधी -** संत हे आपल्याला आध्यात्मिक मार्गावर मार्गदर्शन करतात, वाईट गोष्टींपासून दूर राहण्यास शिकवतात आणि ईश्वराच्या भक्तीचा मार्ग दाखवतात. त्यांच्या संगतीत राहिल्याने आत्मज्ञान प्राप्त होते आणि संतांच्या उपदेशामुळे जीवन अधिक सुखी व शांतीपूर्ण होते, ज्यामुळे हा भवसागर तरण्यास मदत होते. संतांच्या संगतीत राहिल्याने आपल्याला जीवनाचा खरा अर्थ समजतो आणि योग्य मार्गावर चालण्याची प्रेरणा मिळते. संत आपल्याला जगातील मोहांपासून आणि वाईट सवयींपासून दूर राहण्यास शिकवतात, ज्यामुळे आपण आध्यात्मिक प्रगती करू शकतो. त्यामुळे संत संगतीशिवाय तरणोपाय नाही, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

नळडोह पेवा येथे श्रावण मास समाप्ती निमित्त आयोजित ह भ प अर्जुन महाराज लाड यांच्या काल्याच्या कीर्तन कार्यक्रम प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, संतांच्या सहवासात राहून आत्मज्ञानाची प्राप्ती होते,



ज्यामुळे आंतरिक शांती आणि समाधान मिळते. संत आपल्याला ईश्वराच्या नामाचे महत्त्व सांगतात आणि भक्तीचा मार्ग दाखवतात, ज्यामुळे मोक्ष प्राप्तीचा मार्ग सुकर होतो. संत हे खऱ्या अर्थाने जीवनात सकारात्मक बदल घडवतात. त्यांच्या संगतीने जीवनातील दुःख कमी होते आणि सुख व आनंद वाढतो. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

**आमदार बबनराव लोणीकर शब्दाला जागणारा माणूस - हभप अर्जुन महाराज लाड**

संत जनार्दन स्वामी संस्थान नळडोह पेवा येथे १ कोटी रुपयांचा सभामंडप देण्याचा शब्द आमदार बबनराव पान ३ वर

---

## क्रीडा स्पर्धेमुळे राष्ट्रीय एकात्मताची भावना जोपासली जाते- पोउपनि पठाडे



**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-१ व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना व जिल्हा परिषद जालना यांच्या आदेशान्वये सिद्धार्थ महाविद्यालय मध्ये १४,१७,१९ वर्षातील मुला मुलींची तालुकास्तरीय क्रीडा हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन सिद्धार्थ महाविद्यालय येथे करण्यात आले होते या क्रीडा स्पर्धेचे अध्यक्ष सिद्धार्थ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील मेढे हे होते व या हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटक जाफ्राबाद पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक राजधर पठाडे हे होते यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करीत असताना खेळामुळे राष्ट्रीय भावना जोपासली जाते व खेळाडूंमध्ये राष्ट्रीय प्रेम वाढते खेळामुळे खेळाडूंमध्ये शिस्त दिसून येते खेळाडूंनी जिद्दीने चिकाटीने प्रमाणिकपणे नेहमी सराव करावा व खेळाडूंनी आपल्या पान ३ वर

---

### रोटरी आणि रोटरॅक्ट क्लबच्या स्वरम आंतरशालेय स्पर्धेत २८ शाळांचा सहभाग

## रिषी स्कूल व सीटीएमके गुजराती विद्यालय प्रथम

**जालना । प्रतिनिधी -** रोटरी क्लब ऑफ जालना व रोटरॅक्ट क्लब ऑफ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आणि प्रायोजक एसआरजे स्टीलच्या सहकार्याने शनिवार, दि. २३ ऑगस्ट रोजी जेईएस महाविद्यालयात पार पडलेल्या स्वरम आंतरशालेय गायन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिक प्रदान करण्यात आले.

प्रारंभी रोटरी क्लब ऑफ जालनाच्या अध्यक्षा वर्षा पित्ती, सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत, प्रकल्प प्रमुख प्रशांत महाजन, सुनीती मदन, यश बगडिया रोटरॅक्ट क्लबचे अध्यक्ष चिराग तलरेजा, सचिव शैलेश जैन, प्रकल्प प्रमुख सुमित जैन, अजय जाधव व जितेंद्र कारिया यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलनाने स्पर्धेला सुरुवात झाली.

सभागृह देशभक्तीच्या स्वरांनी गुंजून गेले आणि स्वरमने खऱ्या अर्थाने जालन्यातील सांस्कृतिक वारसा अधिक समृद्ध केला. या स्पर्धेत सहभागी २८ शाळांच्या विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांनी वातावरण भारावून टाकले. या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली. या कार्यक्रमाद्वारे देशभक्तीची भावना जागृत झाली तसेच बालकलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी एक व्यासपीठ मिळाले. अशा प्रकारच्या आंतरशालेय स्पर्धेचे हे तिसरे वर्ष होते.

वाद्यासह गायन या गटात रिषी स्कूलने प्रथम, एमआरडीए स्कूल ने द्वितीय तर पायोनियर इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलने तृतीय, फक्त गायन या गटात एटीएमके गुजराती विद्यालयाने प्रथम, देऊळगाव राजा येथील श्री संत तुकाराम महाराज



वारकरी शिक्षण संस्थेने द्वितीय, श्री एम. एस. जैन इंग्लिश स्कूलने पिंपळगाव येथील जिल्हा परिषद शाळेने तृतीय पारितोषिक पटकावले. या संघांना ट्राफी प्रदान करून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. परीक्षक म्हणून सौ. नेहा नितीन दंडे, सखाराम बोरुळ, शिक्षक प्रकाश कुंडलकर यांनी काम पाहिले.

याप्रसंगी ज्येष्ठ रोटरियन अरुण अग्रवाल, उपाध्यक्ष सीए भरत अग्रवाल, सहसचिव अभिजीत मालपाणी, युवा उद्योजक यशराज पित्ती, डॉ. दीपक बगडिया, रवी भक्कड, संदीप मुंदडा, डॉ. विजय जेथलिया, राजेश बजाज, प्रणय राठी, करण अग्रवाल, यशान मित्तल, तन्मय मंत्री, शैलेश काळे, रिषब लदनिया, लखन जैन, आदित्य मालपाणी, सागर सिकची, राहुल बोरा, अर्जुन राऊत, शुभम राठोड, जय राऊत यांच्यासह रोटरी परिवारातील सदस्य, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि संगीतप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

### गणेशोत्सवात विधायक कामे करावीत

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करुन शतकोत्तर रौप्य महोत्सव उलटला आहे. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय संस्कृतीची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमनशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून लोकमान्य टिळकांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्यात देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव ही महाराष्ट्राची परंपरा बनली. आजही ती परंपरा मोठया भक्तिभावाने जोपासली जाते. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राची ओळख आहे. लवकरच गणेशाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत सर्वच गणेशभक्त गणेशाची मनोभावी पूजा करतात. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते मात्र अलीकडच्या काळात गणेशोत्सवाचे हे स्वरूप बदलू लागले आहे. टिळकांनी ज्या उद्देशाने हा सण सुरू केला तो उद्देशच आता हरपला आहे. इतकेच काय पण या उत्सवाचे पावित्र्यही कमी होऊ लागले आहे. आज हा उत्सव न राहता इव्हेंट बनला आहे. उंचच उंच मूर्तींची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. या मोठ्या मुर्त्या समुद्राच्या पाण्यात विसर्जित करताना दोरीच्या साहाय्याने बांधाव्या लागतात. उंचच उंच मूर्तीचे अवडंबर न माजवता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती खरेदी करून तिची प्राणप्रतिष्ठा करावी. शास्त्रानुसार शाडूच्या मातीने गणेश मूर्ती बनवावी असे सांगितले आहे असे असतानाही सर्रास प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मुर्त्या बनवल्या जातात. या मुर्त्या पाण्यात विरघळत नसल्याने पाण्याचेही प्रदूषण होते. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी प्रदूषणही खूप वाढते. गणेशोत्सवात डॉल्बीच्या स्पीकरवर मोठमोठ्या आवाजात गाणी लावून चित्रपटांच्या गाण्यावर हिडीस नृत्य करण्याची फॅशन रूढ झाली आहे. या डॉल्बीचा आवाज इतका मोठा असतो की त्याचा परिणाम लहान मुले व जेष्ठ नागरिकांच्या श्रवण इंद्रियांवर होऊ शकतो. उत्सवाच्या नावाखाली वर्गणी उकळली जाते प्रसंगी धमकीही दिली जाते. त्यावरही गणेशभक्त नाराज आहेत. भक्तांनी जितकी वर्गणी दिली भक्तांनी तीच दान म्हणून स्वीकारावी. गणेशोत्सवात डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते त्यामुळे विजेचाही अपव्यय होतो. तेंव्हा सजावटी रोषणाई यावर मर्यादा घालावी. काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपल्या मंडळाचे मार्केटिंग करत आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी जाहिरात करून सिलेंब्रेटींना बोलवले जाते. त्यातूनच मग मंडळा- मंडळामध्ये मतभेद होऊन तेढ निर्माण होते त्यातूनच मग कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. टिळकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यास सांगितले आहे. दुसऱ्यांना त्रास होऊ न देता गणेशोत्सव साजरा केला पाहिजे. गणेश मंडळांनी दहा दिवसांच्या कालावधीत सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत. गणेश मंडळांनी समाजाला उपयोगी पडतील अशी विधायक कामे करावीत. गणेश मंडळांनी रक्तदान शिबिर आयोजित करावीत. दुष्काळग्रस्तांना, पूरग्रस्तांना मदत करावी तसेच गरीब आणि कोरोना काळात पालक गमवलेल्या अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे. अनाथ आश्रम, वृद्ध आश्रमांना मदत करावी. गणेश मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, नृत्य , निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करावे. गणेश ही बुद्धीची देवता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढीस लागेल असे उपक्रम राबवावेत. हा उत्सव जितका साधेपणाने साजरा केला जाईल तितकेच त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# न्यायालयात कुत्रे जिंकले.. सर्वसामान्य माणसाचं काय...

धार्मिक परंपरा अन् भूतदयेच्या नावाखाली भटक्या प्राणीमात्रांना खाऊ-पिऊ घालण्याचा भावनिक मुद्दा सध्या देशात चांगलाच चर्चेत आहे. एकीकडे मुंबईतील जैन धर्मिय कबूतरांना दाणापाणी घालण्यासाठी इरेला पेटलेले असताना तिकडे राजधानी दिल्लीत भटक्या कुत्र्यांनी अक्षरशः थैमान घातले आहे. या सर्व गल्लीबोळातील भटक्या कुत्र्यांना पकडून जेरबंद करण्याचा अत्यंत महत्त्वाचा निकाल सर्वोच्च न्यायालयानं दिला होता. या निकालामुळं भटक्या कुत्र्यांच्या दहशतीनं त्रस्त सर्वसामान्य दिल्लीकरांना मोठा दिलासा मिळाला होता. परंतु न्यायालयाचा हा निकाल दिवसरात्र आपल्या मांडीवर कुत्री खेळवणाऱ्या उच्चभ्रू श्वानप्रेमींना पटला नव्हता. भटक्या कुत्र्यांचा कळवळा येणाऱ्यांच्या आर्जवाची दखल खुद्द सरन्यायाधीशांना घ्यावी लागली. अखेर भटक्या कुत्र्यांच्या ज्वलंत विषयावर नव्याने विशेष खंडपीठ स्थापन करण्यात आले. या खंडपीठाने नुकताच आपला निकाल दिला. भटक्या कुत्र्यांची नसबंदी करून त्यांना पुन्हा आहे त्याच जागी सोडण्याचा खंडपीठाने दिलेला निकाल श्वानप्रेमींच्या आनंदात भर टाकणारा असला तरी, सर्वसामान्यांची पुरती निराशा करणारच आहे. विशेष म्हणजे हा निकाल सर्वच राज्यांना लागू असणार आहे.

हे प्रकरण दिल्लीतील भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात असले, तरी त्याची व्याप्ती मोठी आहे. कारण देशातील सर्वच राज्यांमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत पसरलेली आहे. महापालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषदा व इतर स्थानिक प्राधिकरणे भटक्या कुत्र्यांच्या संख्येला लगाम घालण्यात पुरती अपयशी ठरली आहेत. नव्वदच्या दशकांत स्थानिक प्राधिकरणांकडून भटक्या कुत्र्या-मांजरांना पकडून त्यांची नसबंदी केली जायची. त्यामुळे त्यांची संख्या आटोक्यात होती. परंतु मनेका गांधी यांना रोलमॉडेल मानत असलेले अनेक श्वानप्रेमी व त्यांच्या स्वयंसेवी संघटनांनी मागील काही वर्षांमध्ये भूतदयेच्या नावाखाली वेगवेगळ्या न्यायालयात खटले दाखल केले. मुक्या कुत्र्या-मांजरांना अनामुषपणे पकडून त्यांच्यावर स्थानिक प्राधिकरणांकडून अन्याय होत असल्याचे दावे या याचिकांमधून करण्यात आले. परिणामी राज्य सरकारच्या निधीवर सुरू असलेल्या या नसबंदीच्या प्रक्रियेत अडचणी निर्माण होत गेल्या, निर्बिजिकरण केंद्रांची संख्या घटत गेली व दुसरीकडे रस्त्यांवर कुत्र्या-मांजरांची संख्या वाढत गेली. कधीकाळी कोल्हा, लांडग्याच्या संकरातून नवा जन्म घेत मानवी वस्तीत स्थिरावरलेला, माणसानेच टाकलेल्या भाकरीवर वाढलेला कुत्रा रात्रीच्या अंधारात दात खाऊन माणसाच्या अंगावर धावून येऊ लागला आहे. देशातल्या प्रत्येक शहरात, तालुक्यात, जिल्ह्यात, गल्लीबोळात मागच्या काही वर्षांमध्ये

कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी तयार झाल्यात. काही झुंडी कचऱ्यावर पोसल्यात तर, काही झुंडी श्वानप्रेमींनी टाकलेले दूध-भात, बिस्किटे आणि कोंबड्यांच्या कच्च्या मांसावर धष्टपुष्ट झाल्यात. या झुंडींना रस्त्यावरुन, गल्लीतून जाणाऱ्या लहान उंचीच्या एकट्या मुलात आता भक्ष्य दिसू लागले आहे. लहान मुलांचा माग काढत त्यांच्यावर एकत्र येऊन जीवघेणा हल्ला करणे, लचके तोडण्यात आल्याचे अनेक व्हिडीओ तुम्ही-आम्ही बघितले असतील. ही सगळी दृश्ये, घडणाऱ्या घटना अत्यंत भयावह आहेत. कुत्र्या-मांजराचे निर्बिजीकरण थांबल्याचा हा परिणाम आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात भटक्या कुत्र्यांच्या निर्बिजीकरणावर भर दिला आहे. हा अत्यंत चांगला निर्णय आहे, परंतु या कुत्र्यांना निर्बिजीकरणानंतर पुन्हा आहे त्याच ठिकाणी सोडण्याचा निर्णय धोकादायकच म्हणावा लागेल. शिवाय कुत्र्यांना रस्त्यावर अन्नपाणी घालण्यास न्यायालयाने मज्जाव केला असला, तरी त्यासाठी फिडींग झोन तयार करण्याचा मुद्दाही वादाचाच म्हणावा लागेल. रेबिज झालेले कुत्रे व आक्रमक कुत्र्यांना शेल्टर होममध्ये ठेवले जाईल. परंतु आक्रमक कुत्रे म्हणजे काय ? याची व्याख्या न्यायालयाने स्पष्ट केलेली नाही. दिवसभर वाहनांखाली, इमारतीच्या सावलीत शेपूट पाठीमागे घालून निवांतपणे झोपलेले हे कुत्रे रात्रीच्या अंधारात दानवी रुप धारण करतात. एरियातील एका एका भिडूला सोबतीला घेत या झुंडी कुठे वाहनांच्या मागे धावतात, तर कुठे लहानमोठ्यांच्या अंगावर धावून त्यांच्यावर हल्ला करतात, अगदी काहीच नाही तर वाहनांच्या सीट फाडण्याचे उद्योगही करतच असतात,



यापैकी कुठल्या कुत्र्यांना पकडून स्थानिक प्राधिकरणे शेल्टर होममध्ये नेऊन टाकणार हे यामुळे स्पष्ट होत नाही. कारण तसे करायचे म्हटल्यास या श्रेणीत ९० ते ९५ टक्क्यांपेक्षा जास्त भटके कुत्रे येतातच येतात. शिवाय रेबिज होऊन पिसाळलेल्या कुत्र्यांना शोधून काढत त्यांना पकडणे हेदेखील स्थानिक प्रशासनापुढे आव्हान असेल. असो. न्यायालयाने आपलाच निर्णय फिरवला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयापुढे आता कुणीही जाऊ शकणार नाही, हेदेखील वास्तव आहे. न्यायालयाच्या निर्णयानुसार आता राज्य सरकारांनी व स्थानिक प्राधिकरणांनी कुत्रे पकडून त्यांचे निर्बिजीकरण करण्याची मोहीम गांभीर्याने हाती घेण्याची आत्यांतिक गरज आहे. निर्बिजीकरणाची केंद्र वाढवून, मनुष्यबळ पुरवण्यासाठी निधीची उपलब्धता होणेही गरजेचे आहे. या निर्बिजीकरणानंतर रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांची संख्या आणि ते झुंडीने अंगावर धावून येण्याची मूळ समस्या काही एकाएकी कमी होणार नाही. निर्बिजीकरण मोहीम सुरू होऊन कुत्र्यांची संख्या नियंणत्रात येण्यासाठी काही वर्षांचा कालावधी जावा लागेल. तोपर्यंत रस्त्यावरुन रात्री पायी घरी चालत जाणाऱ्या सर्वसामान्यांना कुत्र्यांच्या दहशतीमुळे जीव मुठीत घेऊन घर गाठावे लागणार आहे.

**श्री शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.बेलेवाडी (मासा)**
**ता.कागल, जि. कोल्हापूर.**

# आपले मंडक उत्कृष्ट ठरावे

आता गणपती उत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा केला जाणार आहे तेव्हा आता सर्व दृष्टीने उत्सव कसा अधिकाधिक चांगला साजरा करून त्याला धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक दृष्टिकोनातून कशाप्रकारे अधिकाधिक चांगले स्वरूप देता येईल याचा विचार व्हायला हवा आहे. तसेच महत्त्वाचे म्हणजे गेल्या अनेक वर्षांपासून उत्सवामध्ये डी.जे.चा आणि लेझर किरणांचा वापर करून गाणे वाजवले जातात आणि असे धुंद होऊन तरुण पिढी नाचत असते त्यातून काही साध्य होत नाही. डी.जे लेझर किरणांच्या वापरामुळे पण अंधत्व येणे, बहिरेपण येणे, बऱ्याच वेळा वयस्कर लोकांना हार्ट अटॅक येणे लहान मुलांना, रुग्णालयात त्रास होणे. अशा अनेक घटना घडतात.

पण त्याच ऐवजी मंडळांनी पारंपरिक वाद्याचा वापर केला तर ते अधिक प्रशस्त व चांगले ठरेल. त्यानिमित्ताने सामाजिक उद्बोधन करणारे चांगले विचार देणाऱ्या व्याख्यानमाला आयोजित कराव्यात. सुंदर सुंदर देखावे गणपती समोर करावेत. प्लास्टिकच्या फूलां ऐवजी सुवासिक फुलांचा वापर करावा जेणेकरून वातावरणात प्रसन्नता राहील.अध्यात्मिक वातावरणाची निर्मिती होईल.

गणेशोत्सवाच्या मंडळांसाठी स्पर्धा ठेवावी व गाव परत या मंडळांनी महोत्सव समितीच्या नियमांचे पालन करून उत्सव साजरा केला त्यांना बक्षीस देण्यात यावे.

डी.जे. च्या आवाजाची पातळी योग्य ठेवा व डी.जे चा वापर करावा अशी परवानगी दिली तरी त्याचा काही उपयोग होत नाही. कारण एकदा का ती कार्यक्रमाची धुंदी चढली की मग ऑर्केस्ट्रा कडे किंवा नृत्यांगनाच्या नृत्याकडे लक्ष वेधले जाते.हे थांबायला हवे.ही आपली संस्कृती नाही. लोकमान्य टिळकांनी कोणत्या विचारांनी





आवाजाच्या पातळीचे भान राहत नाही. बऱ्याच वेळा मंडळाच्या कार्यकर्त्यांमुळे अधिकारी हतबल होतात किंवा त्यांच्यावरही राजकीय दबाव असतो. तेव्हा आता राज्य महोत्सव झाल्यामुळे शासनाने लक्ष घालून डी.जे.च्या वापरा बंदी आणावी हेच योग्य.

दहीहंडी चे कार्यक्रमात जे प्रकार आपण बघीतले, राजकीय मंडळी कार्यक्रमात सहभाग देतात, देणग्या देतात, तसेच तालवर नाचतात, त्यामुळे मुळ कार्यक्रमाकडे लक्ष न राहता अशा गणेशोत्सव यांना सार्वजनिक स्वरूप दिले याचा आता विसर पडत चालला आहे तेव्हा त्यातून धार्मिक सांस्कृतिक आणि देशभक्ती या गोष्टी कशा साध्य होतील हा विचार समोर ठेवायला हवा आहे.

गणेशोत्सवाला महोत्सवाचे स्वरूप यासाठी जी समिती असेल त्या समितीने व सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी या सर्व बाबींचा विचार करावा ही अपेक्षा आहे.

**दिलीप देशपांडे. जामनेर.**
**जि. जळगांव. मोबा.८९९९५६६९१७**

# जैन कलार समाज लॉन नागपूर येथे २८ ऑगस्टला श्री गजानन महाराज (ऋषीपंचमी) समाधी सोहळा




**नागपूर -** श्री संत गजानन महाराज यांच्या समाधी सोहळ्याच्या निमित्ताने गुरूवार दिनांक २८ ऑगस्ट २०२५ ऋषीपंचमीला जैन कलार समाज जेष्ठ नागरिक मंडळ व आपुलकी परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने जैन कलार समाज लॉन उमरेड रोड,रेशीमबाग नागपूर येथे दुपारी ४ वाजता श्री गजानन विजय ग्रंथ सुश्राव्य संगीत पारायण आयोजित करण्यात आले आहे. श्री गजानन महाराज विजय ग्रंथातील २१ अध्यायांवर आधारित २१ गीतांच्या संगीत पारायणाचा आगळावेगळा कार्यक्रम याठिकाणी आयोजित करण्यात आलेला आहे. प्रथमच तयार करण्यात आलेला हा उपक्रम श्री गजानन उपासना केंद्र, माधवनगर, नागपूर यांच्या संयोगाने याठिकाणी प्रस्तुत करण्यात येणार आहे व याठिकाणी श्री गजानन विजय ग्रंथाचा सुरेल सांगीतिक आविष्कार सर्वांना पहायला मिळेल. या कार्यक्रमाचे सारांश अध्याय वाचन सुषमा वखरे करतील. या कार्यक्रमाचे निर्माता, संगीत दिग्दर्शक व काव्यरचना श्री विनोद वखरे करतील.याला मधुन संगीताची साथ देतील संगीत संयोजन श्री श्रीकांत पिसे.या कार्यक्रमाला बहारदार आणि रसाळ करण्यासाठी गायक कलाकार रसिका बावडेकर, विनोद वखरे,यश खेर, स्वरदा देशपांडे आणि वादक कलाकारांच्या माध्यमातून नवं चैतन्य निर्माण करण्याचे काम करतील गोविंद गडीकर,अरविंद उपाध्ये,श्रीकांत पिसे, मोरेश्वर दहासहस्त्र, विशाल दहासहस्त्र यांच्या उपस्थितीत या रंगारंग भक्तीमय कार्यक्रमाचे आयोजन जैन कलार समाज आपुलकी परिवारातर्फे आयोजित केले आहे.या कार्यक्रमांचा संपूर्ण श्री संत गजानन भक्तांनी अवश्य लाभ घ्यावा.

# शास्त्री महाविद्यालय ग्रंथालयाच्या सभासद विद्यार्थ्यांना देणार पुरस्कार; वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी पुढाकार

**परतूर । प्रतिनिधी -** येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाच्या वतीने ग्रंथालयाचा सर्वाधिक वापर करून अभ्यासक्रमासह पूरक वाचनाची सवय जपणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ग्रंथालय व माहितीशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त यंदाच्या वर्षापासून हा उपक्रम महाविद्यालयाच्यावतीने राबविला जाणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ.भारत खंदारे यांनी दिली. डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी महाविद्यालयात करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.भारत खंदारे तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. रवी प्रधान,डॉ. राजेंद्र फासे,डॉ. बाबासाहेब मुजमुले यांची उपस्थिती होती. महाविद्यालयीन युवकांचा वाचनाकडचा कल काहीसा कमी झाल्याचे मागील काही वर्षांत पाहायला मिळते.बहुतांश युवक समाज माध्यमांच्या जाळ्यात अडकत चालल्याचे पाहायला मिळते. मराठीसह इतर भाषांमधील दर्जेदार साहित्याची युवकांना ओळख झाली पाहिजे, त्या माध्यमातून आपली संस्कृती कळण्यास आपल्याला मदत होईल. युवकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी हा उपक्रम निश्चितपणे उपयोगी ठरेल असे पुढे बोलतांना खंदारे म्हणाले.



एका शैक्षणिक वर्षात ग्रंथालयाचा सर्वाधिक वापर करणाऱ्या पहिल्या तीन विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके व स्मृतिचिन्ह दिले जाणार असल्याची माहिती सहायक ग्रंथपाल डॉ. केशव बरकुले यांनी दिली. कार्यक्रमासाठी डॉ. अनिल कुलकर्णी, डॉ. देविदास थोंबाळ,डॉ. विठ्ठल वजीर, डॉ. सखाराम टकले, डॉ.अविनाश जोशी, प्रा. डॉ.विशाल सरवदे, डॉ. अशोक पाठक, डॉ.यशवंत दुबाले, प्रा. बद्रिनारायन बिडवे, डॉ. श्रीमंत सुरवसे,डॉ. राजेश सुसर, डॉ. शैलेंद्र शेलार डॉ. नितीन माने डॉ. सुधाकर बोथीकर, डॉ. श्याम अबूज प्रा. अभिषेक फंड तर कार्यालयीन अधीक्षक सुधाकर काटे,मुख्य लिपीक प्रभाकर सुरुंग, पाराजी धुमाळ,ग्रंथालयातील कर्मचारी एस. आर. लाटे, प्रवीण जाधव, डी. एल. कांबळे, एस. आर. गिरे, ज्ञानेश्वर चव्हाण, गजानन देवडे यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनी व महाविद्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ. गोविंद भताने यांची लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याशी भेट

### दंतवैद्यकीय क्षेत्रातील समस्यांवर चर्चा




**नवी दिल्ली -** डॉ. गोविंद नागनाथ भताने, संस्थापक, डॉ. भतानेज छाया फाऊंडेशन, जालना यांनी नुकतीच नवी दिल्ली येथे लोकसभेचे अध्यक्ष श्री. ओम बिर्ला यांची त्यांच्या २० अकबर रोड येथील शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान, डॉ. भताने यांनी दंतवैद्यकीय क्षेत्रातील विविध प्रश्न आणि मागण्यांसंदर्भात एक निवेदन लोकसभा अध्यक्षांना सादर केले.

या महत्त्वपूर्ण भेटीत डॉ. भताने आणि श्री. बिर्ला यांच्यात देशातील आरोग्य आणि वैद्यकीय क्षेत्रातील सध्याच्या समस्या आणि त्यांच्या निवारणासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा झाली. डॉ. भताने यांनी मांडलेल्या मागण्या आणि समस्यांकडे लोकसभा अध्यक्षांनी सकारात्मक दृष्टीने पाहिले. त्यांनी या सर्व मागण्या तात्काळ केंद्रीय आरोग्यमंत्री, भारत सरकार यांच्याकडे पाठवून यावर योग्य तो विचार करण्याचे आश्वासन दिले.

या भेटीदरम्यान, डॉ. भताने यांनी त्यांच्या छाया फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याची माहिती देणारे एक विशेष पुस्तक श्री. बिर्ला यांना सादर करून त्यांचा सन्मान केला. फाऊंडेशनच्या शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या विविध क्षेत्रांतील सामाजिक उपक्रमांचे लोकसभा अध्यक्षांनी कौतुक केले. त्यांनी डॉ. भताने यांना त्यांच्या भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. हा क्षण आपल्यासाठी अत्यंत अभिमानास्पद असल्याचे डॉ. भताने यांनी नमूद केले.

या प्रसंगी, माजी केंद्रीय मंत्री श्री. रावसाहेब पाटील दानवे, माजी आमदार श्री. कैलासशेठ गोरंट्याल आणि भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांनी डॉ. भताने यांचे अभिनंदन केले आणि छाया फाऊंडेशनच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. डॉ. भताने यांची ही भेट दंतवैद्यकीय क्षेत्रातील समस्यांना राष्ट्रीय स्तरावर मांडण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरली आहे.

# कर्जत-खोपोली रस्त्यावर रायगड पोलिसांची सायकलिंग मोहीम एसपी आँचल दलाल यांच्या हस्ते सायकल रॅलीला हिरवा झेंडा

**बोरघर | माणगाव | प्रतिनिधी** - रायगड पोलिसांच्या वतीने फिटनेसविषयी जनजागृती करण्यासाठी रविवारी दि. २४ ऑगस्ट रोजी कर्जत-खोपोली रस्त्यावर दहा किलोमीटरची सायकलिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली. सकाळी आठ वाजता सुरू झालेल्या या उपक्रमात परिसरातील पोलीस अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते, विद्यार्थी आणि सायकलपटूंनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. फिट इंडिया व अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिमेअंतर्गत सायक्लोथॉन २०२५ या स्पर्धेत खोपोलीचा विश्वजित जयश्री दयानंद पोळ याने प्रथम क्रमांक पटकावला.

या मोहिमेचे विशेष घोषवाक्य होते फिटनेस की डोस, अर्धा घंटा रोज. या माध्यमातून युवकांसह सर्वसामान्य नागरिकांनी दररोज थोडा वेळ शारीरिक तंदुरुस्तीला द्यावा, असा संदेश देण्यात आला. कर्जत-खोपोली मार्गावरील नांगुर्ले ते अंजरुन या दहा किलोमीटर अंतरावर ही स्पर्धा पार पडली. विजेत्या सहभागींचा बक्षिसांनी सत्कार करण्यात आला.

रायगड पोलिस अधीक्षक श्रीम. आँचल दलाल यांनी या उपक्रमाविषयी माहिती देताना सांगितले की, नागरिकांनी नियमित व्यायाम करून आरोग्याची काळजी घ्यावी, यासाठीच ही मोहीम राबवण्यात आली आहे. त्यांनी कर्जत-खोपोली परिसराच्या निसर्गरम्य सौंदर्याचेही कौतुक केले.

या कार्यक्रमाला कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राहुल गायकवाड, खालापूर उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. विशाल नेहुल, पोलीस निरीक्षक श्री. तानाजी नारनवर, कर्जत पोलीस



निरीक्षक श्री. संदीप भोसले, खालापूर पोलिस निरीक्षक श्री. सचिन पवार, खोपोली पोलिस निरीक्षक श्री. सचिन हिरे, रसायनी पोलिस निरीक्षक श्री. संजय बांगर, पोलिस निरीक्षक श्रीम. सरिता चव्हाण, तसेच कर्जत, खालापूर आणि खोपोली पोलीस ठाण्यांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून या उपक्रमाचे स्वागत केले.

कर्जत-खालापूर भागात अशा प्रकारचा उपक्रम पहिल्यांदाच झाल्याने परिसरात उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. रायगड पोलिसांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# संभाजी ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षपदी कैलास खांडेभराड यांची फेरनिवड

**जालना | प्रतिनिधी -** संभाजी ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षपदी कैलास खांडेभराड यांची फेरनिवड करण्यात आली आहे.

पुणे येथे झालेल्या राज्यभरातील जिल्हाध्यक्षांचा पदग्रहण सोहळ्यात संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ड.मनोज आखरे,महासचिव सौरभ खेडेकर ,कोषाध्यक्ष संतोष गाजरे, मूख्य प्रवक्ते प्रा.गंगाधर बनबरे,प्रदेश प्रवक्ते प्रा.सूदर्शन तारख,प्रदेश संघटक डॉ.बालाजी जाधव आदी मान्यवरांच्या हस्ते कैलास खांडेभराड नियुक्तीपत्र देण्यात आले.दरम्यान प्रदेश निवड समितीने कैलास खांडेभराड यांच्यावर विश्वास दाखवत त्यांची फेर नियुक्ती केल्याबद्दल विभागीय अध्यक्ष रमेश गायकवाड, विभागीय कार्याध्यक्ष विजय वाढेकर, जिल्हासचिव दत्तात्रय कपाळे, ज्ञानेश्वर ताकट, जगन्नाथ काळे, विनोद जाधव, नारायण निंबाळकर, बाळासाहेब खवणे, संतोष चाळसे,दिपाली दाभाडे, ज्योती मूजमूले, सुवर्णा राऊत, वैशाली घूले, निर्मला पडोळ, अर्चना शिरावले, संतोषी देशमुख, राजेश काकडे, आसाराम झोल, संदीप पंडीत, सतीश सूळ, आशिष अग्रवाल, केशव घारे, प्रा.पाडूरंग नवल, मूरारी अग्रवाल, शेख जावेद, विजय कांबळे, संतोष कोल्हे आदीनी या निवडीचे स्वागत केले आहे.




## आजचे राशीभविष्य

**मेष** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला आहे. तुमच्या कामामध्ये प्रगती होईल आणि वरिष्ठांकडून प्रशंसा मिळेल. आर्थिक स्थिती सुधारेल. कुटुंबासोबत वेळ घालवल्याने मन आनंदी राहील.

**वृषभ** – तुमच्यासाठी आजचा दिवस संमिश्र असणार आहे. कामाच्या ठिकाणी काही अडचणी येऊ शकतात, पण तुम्ही त्यांवर सहज मात कराल. आरोग्याची काळजी घ्या.

**मिथुन**– आजचा दिवस तुमच्यासाठी लाभदायक आहे. जुन्या गुंतवणुकीतून चांगला फायदा होईल. नवीन कामाची सुरुवात करण्यासाठी हा दिवस उत्तम आहे. तुमच्या बोलण्याने इतरांवर चांगला प्रभाव पडेल.

**कर्क** - आज तुम्ही भावनिक राहाल. कोणाशीही वाद घालू नका. कामावर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. संध्याकाळचा वेळ कुटुंबासोबत घालवल्याने तुम्हाला आराम मिळेल.

**सिंह**– आजचा दिवस तुमच्यासाठी उत्साहाने भरलेला आहे. कामामध्ये यश मिळेल. सामाजिक कार्यात भाग घेतल्याने तुमचा मान-सन्मान वाढेल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे.

**कन्या**– आज तुम्हाला तुमच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. कामाच्या ताणामुळे थकवा जाणवू शकतो. योग्य नियोजन करून काम केल्यास यश मिळेल.

**तुळ** – आजचा दिवस तुमच्यासाठी आनंददायी आहे. तुमच्या मित्र आणि कुटुंबासोबत चांगला वेळ घालवाल. कामामध्ये नवीन संधी मिळतील. आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करा.

**वृश्चिक**– आज तुम्हाला थोडे सावध राहावे लागेल. महत्त्वाचे निर्णय घेण्यापूर्वी नीट विचार करा. अनावश्यक खर्च टाळा. तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करा.

**धनु** – आजचा दिवस तुमच्यासाठी शुभ आहे. अडकलेली कामे पूर्ण होतील. तुमच्या प्रयत्नांना यश मिळेल. प्रवास करण्याची शक्यता आहे, ज्यामुळे तुम्हाला फायदा होईल.

**मकर** – आज तुम्ही कामामध्ये खूप व्यस्त असाल. नवीन जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठी तयार राहा. तुमच्या कामाची प्रशंसा होईल. संध्याकाळी कुटुंबासोबत वेळ घालवा.

**कुंभ** – आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला आहे. तुमच्या कल्पनांना वास्तवात आणण्यासाठी हा दिवस योग्य आहे. तुमच्या बोलण्याने इतरांना प्रभावित कराल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.

**मीन** – आज तुम्हाला शांत आणि संयमी राहणे आवश्यक आहे. काही आव्हाने येऊ शकतात, पण तुम्ही तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. योग किंवा ध्यान केल्याने तुम्हाला मानसिक शांती मिळेल.

**टीप:** हे सामान्य राशी भविष्य आहे. प्रत्येक व्यक्तीच्या कुंडलीनुसार त्यात बदल होऊ शकतो. अधिक माहितीसाठी तुम्ही ज्योतिषाचा सल्ला घेऊ शकता.

# डोणगांव येथे होणारे सन उत्सवात शांततेच्या मार्गाने साजरे करण्यात यावी; डिजे मुक्त करा, कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी गरज

### शांतता कमिटीची बैठक संपन्न

**जाफराबाद | प्रतिनिधी -** तालुक्यातील डोणगांव येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये परिसरात दि २१ रोजी गावामध्ये येणाऱ्या सन उत्सवात शांततेच्या मार्गाने साजरा करावे पोळा गणेश उत्सव ईद-उल मिलादुन्नबी त्यावेळी मिरवणूक डीजे मुक्त करण्यात यावी एक गाव एक गणपती ही संकल्पना राबवून गावकऱ्यांनी युवकांनी सहकार्य करून शांततेत साजरा करावे कोणीही कायदा हातात घेऊन नाही सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भारती जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी पोलिस ठाण्या अंतर्गत येणाऱ्या गावा गावात नागरीकांनी येणारे सर्व



धर्मीय सन उत्सव शांततेच्या मार्गाने साजरे करून डिजे मुक्त करा सन उत्सवाच्या काळात शांतता भंग करणाऱ्या व कायदा सुव्यवस्था हातात घेणा -यांची गय केली जाणार नाही असे आव्हान करण्यात आले मार्गदर्शन करतांना बोलत होते येणाऱ्या सर्व धर्मीय सन उत्सव काळात डिजे मुक्त सण साजरे करावे गणपती विसर्जन व पोळा सनाला कोणालाही प्रवांनगी दिली जाणार नाही शांतता कमिटीची बैठकीला उपसरपंच मिलिंद जाधव, नूर मोहम्मद हाजी , बाबासाहेब पुंगळे,फरोज शेख पत्रकार,जाफर शेख , मारुती हिवाळे, एकनाथ पुंगळे , सुभाष रजाळे , ज्ञानेश्वर सुरसे , मारुती रजाळे, जानकीराम अंभोरे, अन्सार शेख , राजू घोडके , प्रकाश घोडके , साजेद शेख,गणेश मंडळाचे पदाधिकारी गावातील जेष्ठ नागरिक उपस्थित होते

# माहोरा येथील डॉ. रवींद्र कासोद यांचे अपघाती निधन

**टेंभूर्णी | प्रतिनिधी -** जाफ्राबाद तालुक्यातील माहोरा येथील स्व. डॉ. रवींद्र संपतराव कासोद यांचा पोळ्याच्या दिवशी बैल पोळ्याची पूजा करुन झाल्या नंतर ते सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास नेहमी प्रमाणे फिरण्यासाठी माहोरा धाड रोडवर गेले होते. त्यांना एका मोटार सायकलने जोराची धडक दिली त्यात त्यांना गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे नेण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा रात्री एक वाजता मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूची बातमी कळताच माहोरा आणि पंच्यक्रोशीतील नागरिकांनी माहोरा येण्यास सुरवात केली. त्यांच्या चाहता वर्ग खूप मोठ्या प्रमाणात असल्यामुळे जास्त गर्दी जमली होती. डॉ. रवींद्र कासोद हे आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळून शैक्षणिक क्षेत्रात सुद्धा मोठ योगदान आहे. राजकीय क्षेत्रात त्यांच्या खूप मोठा प्रभाव होता ते माहोरा गावचे माजी सरपंच होते. गोर गरीब यांच्या सुखदुःखात नेहमी काम करणारे आणि धावून जाणारे अशी त्यांची ख्याती होती.त्यांची एक मुलगी मेडिकल ऑफिसर म्हणून कार्यरत आहे. दुसरी मुलगी बी डी एस पूर्ण करुन पुढील शिक्षण घेत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, दोन भाऊ, दोन बहिणी, नातवंडे असा खूप मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने माहोरा पंचायक्रोशीत हळहळ व्यक्त केली जात आहे.



त्यांचेवर दिनांक २३ आगस्ट शनिवार दिवशी दुपारी एक वाजता त्यांच्यावर अंत्य संस्कार करण्यात आले. अंत्य संस्कारासाठी खूप मोठा जन समुदाय जमला होता. यामध्ये तालुक्यातील डॉ. असोसियेशन, लेबोरेटरी असिशीयेशन, राजकीय पदाधीकारी तसेच जाफ्राबाद भोकरदन मतदार संघांचे आमदार संतोष पाटील दानवे इत्यादी मंडळी भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यासाठी जमले होते.

पान १ वरुन

## संत संगती ...

लोणीकरांनी मागच्या वर्षी श्रावण मास समाप्ती व काल्याच्या कीर्तन कार्यक्रम प्रसंगी दिला होता तो शब्द आमदार बबनराव लोणीकरांनी पूर्ण केला असून आमदार बबनराव लोणीकर हे शब्दाला जागणारे आमदार आहेत आणि भगवंता समोर दिलेला शब्द पूर्ण करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी साधू संतांसह भगवंताचा आशीर्वाद असतो अशा शब्दात हभप अर्जुन महाराज लाड यांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्या कार्याचं कौतुक केलं. पुढे बोलताना महाराज म्हणाले की, शेगाव ते पंढरपूर हा दिंडी मार्ग देखील आमदार बबनराव लोणीकर यांच्याच कार्य कुशलतेचा एक उत्तम नमुना आहे जो मार्ग आपल्या परिसरात नव्हता तो आणण्याचं कसं पाणी कौशल्य लोणीकरांनी दाखवलं संस्थांच्या विकासासह संपूर्ण मतदारसंघात देव, देश आणि धर्म टिकवण्यासाठी आमदार बबनराव लोणीकर सातत्याने पुढाकार घेतात हे अत्यंत आनंदाची बाब असल्याचे देखील यावेळी ह भ प अर्जुन महाराज लाड यांनी स्पष्ट केले.

मंदिराला २०-२५ लाख रुपयांचा सभामंडप देण्यासंदर्भात वारंवार मागणी केली जात होती परंतु प्रत्यक्षात या ठिकाणी कार्यक्रमाला येणारी संख्या पाहता हभप अर्जुन महाराज लाड यांच्या काल्याच्या कीर्तनातच आमदार बबनराव लोणीकरांनी १ कोटी रुपयांचा सभामंडप देण्याची घोषणा मागील वर्षी केली होती त्याची परिपूर्ती होऊन आज आमदार बबनराव लोणीकर यांनी दिलेला शब्द पाळत सभामडपाचे काम जवळपास पूर्ण होत आले असल्याने समाधान व्यक्त केले आहे. या सभामंडपामुळे मंदिर व परिसरातील भाविकांसाठी भौतिक आणि आध्यात्मिक आधार मिळतो. सभामंडप बांधल्याने विविध धार्मिक कार्यक्रमांसाठी उपयोग होईल, लग्नसराई मध्ये गोरगरिबांच्या लग्नासाठी याचा वापर करता येईल. याशिवाय, सभामंडपामुळे सर्व जाती धर्माच्या भाविकांना एकत्र येण्यासाठी एक हक्काची जागा मिळाली, ज्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये सामुदायिक भावना वाढते आणि मंदिराच्या माध्यमातून सुरू असलेल्या अध्यात्मिक, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांनाही मदत होईल. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

सभामंडपामुळे मंदिर परिसरात शांत आणि सकारात्मक वातावरण निर्माण होते, जिथे भक्तांना आंतरिक शांती मिळते. मंदिर हे आशीर्वादाचे ठिकाण मानले जाते. सभामंडप बांधल्याने भक्तांना दैवी आशीर्वाद मिळतो आणि त्यांची देवतांशी जोडणी वाढते. मंदिर चालवण्यासाठी आवश्यक असलेल्या सेवा, धार्मिक विधी आणि उत्सव, आयोजित करण्यासाठी मदत होईल, मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून, ते सर्व समुदायाला एकत्र आणणारे केंद्र देखील असते. सभामंडपामुळे लोकांना एकत्र येण्यास आणि सामायिक सांस्कृतिक ओळख वाढवण्यास मदत होणार आहे. संस्थांच्या माध्यमातून चालवले जाणारे शैक्षणिक कार्यक्रम, धर्मादाय उपक्रम आणि धार्मिक उत्सव सभामंडपाच्या आधारावर आयोजित केले जातात, ज्यामुळे समाजाचा आध्यात्मिक कणा मजबूत होतो. प्राचीन काळात मंदिरांनी आचार विचारांच्या देवाणघेवाणीचे केंद्र म्हणून काम करत होते तीच विचारांची देवाणघेवाण या मंदिरांच्या माध्यमातून व्हावी असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

यावेळी ह भ प बबन महाराज हांडीकर, सतीशराव निर्वळ गणेशराव खवणे पंजाबराव बोराडे राजेश मोरे नितीन राठोड गजानन देशमुख आनंद जाधव विलास घोडके मनोज देशमुख विठ्ठलराव काळे पांडुरंग काळे भागवत पोटे बाळासाहेब काळे अशोक आप्पा सोनटक्के कानोबा थोरात बाबाजी जाधव किशोर हनवते प्रकाश गबाळे प्रसादराव गडदे प्रकाशराव गडदे विवेक खराबे दिलीप राठोड यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.

## क्रीडा स्पर्धेमुळे ...

तालुक्याचे आपल्या जिल्ह्याचे आपल्या राज्याचे व देशाचे नाव लौकिक करावे. खेळाडूंनी खेळा सोबतच अभ्यासाकडे लक्ष द्यावे. खेळामुळे लोकांना एकत्र आणून ती बंधुत्वाची भावना वाढवते, ज्यामुळे सामाजिक सलोखा टिकून राहतो. असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. सुनील मेढे यांनी पंचांनी न्यायाधीशाप्रमाणे योग्य ते निर्णय द्यावा व खेळाडूंनी शिस्तीत खेळ खेळावा असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थित मध्ये पोलीस उपनिरीक्षक वासुदेव पवार, प्राध्यापक उदय वझरकर, न्यू हायस्कूल चे मुख्याध्यापक रमेश मुरकुटे, प्राध्यापक पहारे सर, प्राध्यापक प्रकाश निकम सर, तालुका संयोजक प्राध्यापक वाहेद पटेल, प्राध्यापक शिवाजी वैद्य यांची प्रमुख उपस्थितीमध्ये क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन असलम शहा यांनी केले. या क्रीडा स्पर्धेमध्ये सिद्धार्थ महाविद्यालय जाफ्राबाद, समर्थ महाविद्यालय जाफ्राबाद, जिल्हा परिषद महोरा, जिल्हा परिषद खासगाव, स्वामी विवेकानंद विद्यालय स्कूल जाफ्राबाद, जिजामाता विद्यालय टेंभुर्णी जिजाऊ इंग्लिश स्कूल जाफ्राबाद इत्यादी शाळांनी क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता. हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद महोरा यांनी व सिद्धार्थ महाविद्यालयांनी कायमचे वर्चस्व राहिले . या क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्वप्निल वाघ, अमोल चव्हाण, आकाश छडीदार , समाधान सुरवसे , विजय मोहिते, गौरव शिंदे, राहुल भटकर, वैभव फदाट यांनी स्पर्धा यशस्वीरित्या पार पडल्या.



**गणेशोत्सवानिमित्ताने गणपती मुर्ती विक्री स्टॉल हे चंद्रशेखर आझाद मैदान येथे लावण्यासाठी जालना शहर महानगर पालिका आग्रही होती. त्या दृष्टिने मनपा प्रशासनाने हालचालीही केल्या मात्र, ही स्टॉल महात्मा फुले मार्केट या गर्दीच्या ठिकाणीच लागल्याची दिसून येत आहे.** **(छायाचित्र - किरण खानापुरे)**

## योगासन स्पर्धेत आकांक्षा, अनामय यांचे यश

**जालना । प्रतिनिधी -** तालुकास्तरीय योगासन स्पर्धेत सेंट मेरीज हायस्कूलचे विद्यार्थी असलेल्या भावंडांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

१४ वर्षाखालील मुलांच्या गटात अनामय पालने आर्टिस्टिक व रिदमिक योगा प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला. तर १९ वर्षाखालील मुलींच्या गटात आकांक्षा पालने आर्टिस्टिक व रिदमिक योगा प्रकारात विजेतेपद पटकावले. या दोन्ही विजेत्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय हिंदी विद्यालयाचे योग शिक्षक बी. एस. पाल यांनी मार्गदर्शन केले. दोघांच्या या उल्लेखनीय यशाचे सेंटमेरी स्कूलचे फादर पत्रास, क्रीडा शिक्षक सतीश, शेजवाल, चैतन्य योग केंद्रातील योग शिक्षक तसेच योगप्रेमींनी कौतुक केले आहे.



### आरडा खारीत शिवसेना (उबाठा) शाखेची स्थापना

# ग्रामीण राजकारणात नवा उत्साह


**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातील ग्रामीण भागात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट - उबाठा) पक्षाचे जनाधार सातत्याने वाढत आहेत. याचे ताजे उदाहरण म्हणजे तालुक्यातील आरडा खारी येथे नवीन शाखेची स्थापना होणे. शनिवारी (दि. २३) झालेल्या या कार्यक्रमाला जिल्हाप्रमुख महेश नळगे व तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. गावातील प्रमुख कार्यकर्ते आणि तरुणांचा मोठा सहभाग असलेल्या या कार्यक्रमात गावात शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढवण्यावर भर देण्यात आला. कार्यक्रमाला ज्ञानेश्वर सरकटे, संजय नागरे, देविदास खरात, दिगंबर बोराडे, प्रल्हाद कदम, महादेव कव्हेळे, गोरख चव्हाण, सचिन चव्हाळ, रवी काळे, निलेश बोराडे, विजय वाघमारे, पवन वाघमारे, महादेव गोडे, प्रवीण पंडित, आदिराज बोराडे आदी मान्यवर उपस्थित होते.

शाखा स्थापनेच्या वेळी बोलताना तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांनी गावागावात शाखा स्थापन करण्याची मोहीम हाती घेतल्याचे सांगितले. त्यांनी पुढे म्हटले- ग्रामीण भागातून पक्षाला मिळणारे पाठबळ हे आमचे बळ आहे. आगामी निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांनी सज्ज राहून गावपातळीवरील प्रत्येक समस्येवर लढा देण्याची तयारी ठेवली पाहिजे.

याचबरोबर जिल्हाप्रमुख महेश नळगे यांनीही पक्षाच्या भूमिका स्पष्ट करत कार्यकर्त्यांना संघटनेत एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात शाखेच्या पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली. शाखाप्रमुख म्हणून संदीप ढेगळे, उपशाखाप्रमुख म्हणून भागवत ढेगळे, सचिव म्हणून अक्षय ढेगळे यांची निवड करण्यात आली. त्याचबरोबर सदस्य म्हणून सतीश बहिरट, माणिक ढेंगळ, वैभव बहिरट, कृष्णा तळेकर, मोहन कळणे, रवी बहिरट, एकनाथ ढेंगळे, गोपीनाथ ढेंगळे, गणेश ढेंगळे, अमोल कळणे, महेश बहिरट, हर्षद आकात, वैभव खराबे, अशोक ढेंगळे, गोविंद ढेंगळे, पाराजी ढेंगळे, बंडू ढेंगळे, बाळू तळेकर, अनिल भदर्गे आदींची नियुक्ती जाहीर करण्यात आली.

आरडा खारीसारख्या गावात शाखेची स्थापना होणे हे ग्रामीण भागातील राजकीय समीकरणांमध्ये बदलाचे द्योतक मानले जात आहे. गेल्या काही महिन्यांपासून उबाठा गटाने तालुक्यात संघटनात्मक वाढीसाठी मोहीम राबवली आहे. त्यामुळे आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता हा विस्तार महत्त्वपूर्ण ठरत आहे.



राजकीय विश्लेषकांच्या मते, ग्रामीण मतदारांच्या प्रश्नांना आवाज देत उभा राहणारा हा गट स्थानिक नेतृत्व आणि तरुण कार्यकर्त्यांमुळे बळकट होत आहे. तसेच गावपातळीवर युवकांच्या सक्रिय सहभागामुळे आगामी निवडणुकांमध्ये या शाखेची भूमिका निर्णायक ठरू शकते. शाखा स्थापनेनंतर गावातील तरुणांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, पक्षाच्या विचारधारेला स्थानिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे पाहायला मिळते. काही तरुण कार्यकर्त्यांनी सांगितले की, आगामी काळात गावातील समस्या आणि विकासकामांसाठी शाखेच्या माध्यमातून एकत्रितपणे आवाज उठवला जाईल. आरडा खारी येथील ही स्थापना फक्त शाखा उभारण्यापुरती मर्यादित नसून, गावपातळीवर पक्षाचा प्रभाव वाढवण्याचा एक ठोस टप्पा ठरत आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील अशा संघटनात्मक हालचाली शिवसेना (उबाठा) गटाला राजकीय बळ पुरवणाऱ्या ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.